साप्ताहिक

“एकच ध्येय... एकच आवाज”

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक १४ वा | सोमवार, दि. २०/०४/२०२६ ते दि. २६/०४/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## श्री परशुराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून गरजू कुटुंबांना गृहपयोगी धान्य किटचे वाटप

धुळे – भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून ’श्री राम ब्राम्हण महासंघ, धुळे’ यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शहरातील २० गरजू कुटुंबांना दैनंदिन उपयोगासाठी आवश्यक असलेल्या गृहपयोगी धान्य किटचे वाटप करण्यात आले.

दि.१९ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास शहरातील प्रसिद्ध आदिमाया शक्तीपीठ एकविरा देवी मंदिर परिसरात हा कार्यक्रम संपन्न झाला. उत्सवाच्या सुरुवातीला भगवान श्री परशुराम यांचा अत्यंत भक्तीमय वातावरणात महाभिषेक करण्यात आला. यावेळी मंत्रोच्चाराने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. केवळ सण साजरा न करता समाजातील वंचितांना मदतीचा हात देणे, हा मुख्य उद्देश ठेवून महासंघाने हा मदतीचा हात पुढे केला आहे. या अंतर्गत प्रत्येक गरजू कुटुंबाला महिनाभर पुरेल इतका गहू, तांदूळ, डाळी व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ’भगवान परशुरामांचे आशीर्वाद आणि सेवाभाव जपत आपण समाजातील गरजू घटकांसाठी हा छोटासा मदतीचा प्रयत्न करत आहोत,’ असे आवाहन महासंघाच्या वतीन करण्यात आले. या मंगल प्रसंगी श्री राम ब्राह्मप महासंघाचे पदाधिकारी आणि मोठ्य संख्येने समाज बांधव उपस्थिन होते. धार्मिक विधीसाठी गणेश मलकापूरकर, सचिन भोलाणेकर हर्षल जोशी, नितीन जोशी, धीरज जोशी, अभिषेक वेल्होणेकर, उदन पंचभाई, अभिषेक पाठक, बाळकृष् कुळकर्णी, भूषण काळे, रवींद्र समी दीक्षित, चंद्रकांत पंडित, विवेळ कुळकर्णी, जितेंद्र कुळकणी, राज भोलाणेकर, तारकेश जोशी, तेजस जोशी, अजय जोशी, आकाश कुळकर्णी, प्रथमेश गुरुजी यांन पौरोहित्य केले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, हिंदू समाज बांधव या कार्यक्रमाला उपस्थिन होते.

## शासकीय कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत माहिती फलक दर्शनी भागात लावावा

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या दर्शनी भागात नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांची व संबंधित शुल्कांची माहिती देणारा सूचना फलक लावण्यात यावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. जिल्ह्यात अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी सर्व शासकीय कार्यालयांनी आपल्या विभागातील सेवांची व शुल्कांची माहिती क्यूआर कोडसह दर्शनी भागात प्रदर्शित करावी. तसेच, दिनांक २८ एप्रिल रोजी ‘सेवा हक्क दिन’ निमित्त सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सकाळी ११.०० वाजता पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी सेवेशी बांधिलकी दर्शविणारी शपथ घ्यावी. यासोबतच, लावण्यात आलेल्या सूचना फलकांचे जीओ-टॅगसह छायाचित्र तसेच शपथीचे छायाचित्र जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे सादर करावेत, असेही निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी कळविले आहे.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना जिल्ह्यात ७ हजार ८०० लाभार्थ्यांनी घेतला लाभ

धुळे (जिमाका) – जिल्ह्यात अनाथ, निराधार, निराश्रित व संकटग्रस्त बालकांना सुरक्षित व कौटुंबिक वातावरण मिळावे यासाठी राज्य शासनामार्फत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून गेल्या तीन वर्षांत ७ हजार ८३७ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमानुसार महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियमानुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलां-मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटुंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणण्यासाठी राज्यात बालसंगोपन योजना सुरू करण्यात आली आहे. यात वर्षांत २०२३-२०२४ मध्ये १ हजार ८३२ लाभार्थी , २०२४-२०२५ वर्षांत २ हजार ६०७ लाभार्थी तर २०२५-२०२६ मध्ये ३ हजार ३९८ लाभार्थी अशा एकूण ७ हजार ८३७ लाभार्थ्यांना आयुक्त कार्यालयामार्फत डीबीटी प्रणालीद्वारे प्रती लाभार्थी २ हजार २५० रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

बाल संगोपन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाचा कालावधी हा अनाथ, स्वतः किंवा दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके, स्वत: किंवा पालक एच.आय.व्ही./ किंवा कॅन्सरग्रस्त असलेली बालके, कुष्ठरोगग्रस्त पालकाची बालके, तीव्र मतीमंद बालके, अशा बालकांना वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत बाल संगोपन योजनेचा लाभ मिळतो. कौटुंबिक कलहात सापडलेल्या बालकांना कौटुंबिक कलह संपुष्टात आल्याबाबतच्या न्यायालयीन आदेश निर्गमित झाल्यापासून सहा महिन्यांपर्यंत किंवा वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. जन्मठेपेची शिक्षा किंवा अन्य शिक्षा भोगत असलेल्या तुरुंगातील पालकांच्या बालकांना पालकांची शिक्षा संपल्यापासून ६ महिन्यांपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय आहे. भिक्षेकरीगृहात दाखल असलेल्या पालकांच्या बालकांना पालक भिक्षेकरी गृहातून मुक्त झालेल्या तारखेपासून सहा महिन्यांपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकाच्या बालकांना प्रकरण निकाली झाल्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्या तारखेपासून ६ महिन्यापर्यंत किंवा बालकाची वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे इ. कारणांमुळे कुटुंब विघटीत झाल्याने एक पालक असलेल्या बालकांना लाभ दिल्यानंतर त्याच्या पालकाने पुनर्विवाह केल्यास पुनर्विवाहाच्या तारखेपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय आहे. तसेच जिल्ह्यातील ११ स्वयंसेवी संस्थांना प्रती लाभार्थी प्रती महिना रुपये २५०/- इतके सहायक अनुदान देण्यात आले आहे. या अनुदानातून बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकीय सुविधा इ. सुविधा संबंधित कुटुंबांमार्फत पुरविण्यात येतात. तसेच स्वयंसेवी संस्थेने सहाय्यक अनुदान रकमेमधून दोन सामाजिक कार्यकर्ता व एक डेटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन, प्रत्येक बालकाची केस फाईल, त्यांचे संबंधित अभिलेख, दस्तऐवज इ. हाताळणी व संग्रहित करण्याचा खर्च, देखरेख, गृहभेटी करीताचा प्रवासखर्चाचा समावेश आहे.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाची कर्ज व्याज परतावा योजना आता अधिक सुलभ ; ऑनलाईन सुविधांमुळे लाभार्थ्यांना दिलासा

धुळे (जिमाका) – अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनेची कार्यपद्धती अधिक सुलभ, पारदर्शक आणि लाभार्थी-केंद्रित करण्यात आली आहे. सुधारित प्रणालीमुळे लाभार्थ्यांना आता अनेक प्रक्रिया स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पूर्ण करता येणार असल्याने दिलासा मिळणार आहे. लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास विकास महामंडळ, धुळे जिल्हा समन्वयक विनायक अस्वार यांनी केले आहे. योजनेतंर्गत बँक मंजुरी स्तरावर कागदपत्राच्या अपूर्णतेमुळे रिजेक्ट फॉर इनक्मप्लिट डॉक्यूमेंट्स या कारणाने प्रलंबित राहिलेली प्रकरणे आता लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिनवर पाहता येणार आहेत. या प्रकरणांमधील अपूर्ण कागदपत्रे लाभार्थी स्वतः ऑनलाईन अपलोड करून पूर्तता करू शकणार आहेत. आवश्यक कागदपत्रे अद्ययावत केल्यानंतर संबंधित प्रकरण स्क्रुटिनी स्तरावर जाईल. या स्तरावर महामंडळाकडून कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी झाल्यानंतर पात्र प्रकरणांसाठी सबमिट पर्याय उपलब्ध होईल. लाभार्थ्यांनी सबमिट केल्यानंतर प्रकरण पुढील तपासणीसाठी मुख्यालयाकडे पाठविले जाईल. व्याज परतावा क्लेम प्रक्रियेतही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. कागदपत्रांतील त्रुटींमुळे होल्ड स्थितीत असलेली प्रकरणे आता लाभार्थ्यांना त्यांच्या लॉगिनवर कारणांसह दिसणार आहेत. अशा प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता संबंधित जिल्हा समन्वयकांमार्फत करावी लागेल. प्राथमिक तपासणी जिल्हा स्तरावर होऊन त्यानंतर विभागीय समन्वयकांमार्फत प्रकरणे मुख्यालयाकडे पाठविली जातील. लाभार्थ्यांनी १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रकरण नियमित करुन घ्यावे. आवश्यक असल्यास जिल्हा समन्वयकांकडून मार्गदर्शन घ्यावे.भविष्यात होल्ड प्रकरणांसाठी आवश्यक कागदपत्रे थेट लॉगिनद्वारे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच, त्रुटी नसलेल्या क्लेम प्रकरणांसाठी पूर्वी व्याज परतावा खात्यात जमा झाल्यानंतरच पुढील क्लेम सादर करता येत होता. मात्र, सुधारित प्रणालीमध्ये प्रकरण सेंट फॉर सीएएफओ स्तरावर पोहोचताच पुढील क्लेम सादर करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार असून प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे. महामंडळाकडून सर्व लाभार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी आपल्या लॉगिनवर जाऊन प्रकरण होल्ड किंवा ब्लॉक होण्याची कारणे तपासावीत व त्वरित कागदपत्रांची पूर्तता करावी. कोणतीही अडचण असल्यास जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे. सर्व संपर्क तपशील महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, लाभार्थ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत वेब प्रणालीद्वारेच अर्ज व प्रक्रिया पूर्ण करावी, असेही कळविण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

**(मागील अंकावरून सुरू)**

राजकीय स्वातंत्र्य आधी की सामाजिक सुधारणा हा टिळक व आगरकर यांच्यातील वाद डॉ. आंबेडकरांच्याही मनात चालत होता. स्वातंत्र्योत्तर भारतात तत्कालीन अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याला काहीच किंमत नसेल, तर त्यातून अधिक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतील. तसे होऊ नये यासाठी आंबेडकरांनी सामाजिक सुधारणा व अस्पृश्यता निर्मूलन ही कार्ये करण्याला अधिक प्राथमिकता दिली. आंबेडकर भारतातील ब्रिटिश सत्तेचे सुद्धा विरोधक होते.

इंग्रज सरकारकडून भारतातील अस्पृश्य समाजाला राजकीय व सामाजिक स्वरूपाचे हक्क इ.स. १९१९ पर्यंत मिळालेले नव्हते. पण ज्यावेळी साउथबरो अध्यक्ष असलेली मताधिकार समिती जेव्हा मुंबई प्रांतात आली, तेव्हा सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापक असताना आंबेडकरांनी २७ जानेवारी, १९१९ रोजी अस्पृश्यांचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नमेंट ऑफ इंडिया क्ट १९१९ बाबत साऊथबरो मताधिकार समितीसमोर साक्ष दिली व समितीला आपल्या मागण्यांचे पन्नास पृष्ठांचे छापील निवेदनही सादर केले. त्यात त्यांनी अस्पृश्यांना मतदानाचा हक्क पाहिजे, त्यांना निवडणुकीस उभे राहता पाले पाहिजे, त्यांच्या मतदारांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत, अस्पृश्यांचे अस्पृश्य प्रतिनीधी अस्पृश्य मतदारांनीच निवडले पाहिजेत आणि अस्पृश्यांच्या मतदारसंघात अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा दिल्या पाहिजेच, यासारख्या मागण्या केल्या होत्या.८९ त्यांच्या प्रभावाखाली अस्पृश्यवर्गीय समाजसेवक व पुढारी सभा घेऊन आपल्या मागण्यांचा पाठपुरावा करणारे ठराव पास करून इंग्रज सरकारकडे पाठवू लागले. समाजप्रबोधनाची ही चळवळ नेटाने सुरू ठेवण्यासाठी चळवळीला मदत करणारे एखादे वृत्तपत्र सुरू करावे असे आंबेडकरांना वाटू लागले.९०

आंबेडकरांचे समाजकार्य सुरू असताना मुंबईत कोल्हापुरचे राजे शाहू महाराज हे आपण होऊन आंबेडकरांना त्यांच्या घरी येऊन भेटले.९१ त्यांनी आंबेडकरांना वृत्तपत्र काढण्यासाठी अडीच हजार रुपयांची मदत केली.९१ आंबेडकरांनी इ.स. १९२० साली मुंबईत मूकनायक नावाचे पाक्षिक सुरू केले व पांडुरंग नंदराम भटकर यांना पाक्षिकाचे संपादक नेमले. मूकनायक पाक्षिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी, १९२० रोजी प्रकाशित करण्यात आला. पहिल्या अंकातील मनोगत नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी लिहिला होता. त्यांनी आपल्या लेखांतून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली व हा अन्याय कमी करण्यासाठी सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार होण्यासाठी त्यांनी सत्ता मिळवणे गरजेचे आहे असे आंबेडकरांना वाटत होते.९२ आंबेडकर ५ जुलै, १९२० मध्ये आपले अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी इंग्लंडमध्ये गेले असता तेथे त्यांनी भारतमंत्री एडविन मॉँटेग्यू यांची भेट घेतली आणि अस्पृश्यांच्या हितांविषयी चर्चा केली.९३

आंबेडकरांच्या आदेशानुसार त्यांचे अनुयायी व अस्पृश्य लोक ठिकठिकाणी सभा घेऊन व आंदोलन करून आपल्या राजकीय हक्कांच्या मागण्या इंग्रज सरकारकडे करु लागले. त्यांचाच भाग म्हणून १९२० मध्ये कोल्हापूर जवळील माणगाव आणि नागपूर येथे अस्पृश्यांच्या दोन परिषदा पार पडल्या. कोल्हापूर संस्थानातील माणगाव या गावात २१ मार्च व २२ मार्च १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष आंबेडकर होते तर शाहू महाराजांची विशेष उपस्थिती होती. आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांच्या सामाजिक हक्कांचे व राजकीय हक्कांचे समर्थन केले. अस्पृश्यांच्या उद्धाराचे व समाजसुधारणेचे कार्य करीत असलेल्या राजर्षी शाहू महाराजांचाही गौरव आंबेडकरांनी केला. तर शाहू महाराजांनी आपल्या भाषणात आंबेडकरांविषयी वक्तव्य केले की डॉ. आंबेडकर आपल्या अस्पृश्य समाजाचा उद्धार करतील आणि आपल्या देशाचाही उद्धार करतील. ते फक्त अस्पृश्यांचेच नव्हे तर देशाचेही थोर राष्ट्रीय नेते होतील. त्यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्य समाजाने अवश्य आपला उद्धार करून घ्यावा. तसे घडले तर सर्वांचेच कल्याण होईल.

३० मे ते १ जून, इ.स. १९२० दरम्यान नागपूर येथे शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद झाली. आंबेडकर आपल्या अनुयायांसह या परिषदेत सहभागी झाले. आंबेडकरांनी या परिषदेमध्ये समाजसेवक विठ्ठल रामजी शिंदे यांचा निषेध करणारा ठराव पास करून घेतला. अस्पृश्यांना इंग्रज सरकारकडून राजकीय व सामाजिक हक्क कशा स्वरूपात मिळावेत, याविषयी आंबेडकर व शिंदे यांच्यात मतभेद होते. इंग्रज सरकारने अस्पृश्यांना स्पृश्यांच्या माध्यमातून राजकीय व सामाजिक हक्क द्यावेत, असे शिंदेंचे मत होते तर त्याच्या उलट इंग्रज सरकारने अस्पृश्यांना अगदी थेट राजकीय व सामाजिक हक्क द्यावेत, असे आंबेडकरांचे मत होते. अस्पृश्यांचे राजकीय व सामाजिक हक्क स्पृश्यांच्या किंवा अन्य कोणाच्याही मर्जीवर अवलंबून असू नयेत, असा आंबेडकरांचा दृष्टीकोन होता. इ.स. १९२६ च्या मे महिन्यात सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील रहिमतपुर येथे आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा महार परिषदेचे अधिवेशन झाले. त्यांनी आपल्या भाषणात महार वतनाविषयी सविस्तर माहिती सांगितली. तसेच अस्पृश्य समाजाला ब्राह्मणी विचारसरणीच्या लोकांपासून सावध राहण्यास सांगितले.

आंबेडकरांनी अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या उत्थानासाठी ९ मार्च १९२४ रोजी दामोदर हॉलमध्ये सहकाऱ्यांची बैठक घेऊन 'बहिष्कृत हितकारिणी सभा' नावाची संस्था स्थापना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' संस्था स्थापना केली व स्वतः त्या संस्थेचे अध्यक्ष झाले. संस्थेचे ध्येय व कार्य सूचित करण्यासाठी शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हे क्रियावाचक व आज्ञावाचक शब्द स्वीकारण्यात आले.९८ भारतीय समाजातील सामाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात असलेल्यांना इतरांच्या बरोबरीस आणणे, हे या सभेचे ध्येय होते. अस्पृश्यांना नसलेल्या नागरी, धार्मिक वा राजकीय हक्कांबद्दल त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे हा उद्देश होता. आंबेडकरांनी सायमन कमिशनकडे एक **विशेष लेख...** पत्र सादर केले व त्यात त्यांनी मागासवर्गीयांसाठी नामनिर्देशन तत्त्वावर जागा आरक्षित ठेवण्यासंबंधी मागणी केली. तसेच भूदल, नौदल व पोलीस खात्यात मागासवर्गीयांची भरती करण्यासंबंधीचीही मागणी केली. सभेमार्फत अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाळा, वसतिगृहे व ग्रंथालये सुरू करण्यात आली.९९१०० या संस्थेमधील पदाधिकाऱ्यांत अस्पृश्य व स्पृश्य समाजांच्या व्यक्ती होत्या. स्पृश्य समाजाचे जे लोक जातीयतेचे व अस्पृश्यतेचे अच्चाटन करु इच्छितात त्यांचे सहकार्य अवश्य घ्यावे, असा आंबेडकरांचा विचार होता. बहिष्कृत हितकारणी सभेने अस्पृश्यांमध्ये शिक्षण प्रसार करणे, वाचनालये सुरू करणे, विद्यार्थी वसतीगृहे काढले इत्यादी कर्तव्ये स्वीकारली. या संस्थेमार्फत सोलापूर (१९२५ मध्ये), जळगाव, पनवेल, अहमदाबाद, ठाणे अशा अनेक ठिकाणी वसतीगृहे सुरू करण्यात आली. १० व ११ एप्रिल १९२५ रोजी बहिष्कृत हितकाकारणी सभेच्या सहकार्याने बेळगाव जिल्ह्यातील निपाणी या गावी मुंबई इलाखा प्रांतीय बहिष्कृत परिषद या संस्थेने आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसरे अधिवेशन आयोजित केले. आंबेडकरांनी सामाजिक सुधारणांसाठी तयार व्हा असा संदेश देणारे भाषण केले. त्यावर प्रभावित होऊन अस्पृश्यांनी बेळगाव येथे मुलांचे वसतीगृह सुरू केले. पुढे इ.स. १९२९ मध्ये हे वसतीगृह धारवाडला हलवण्यात आले. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकाकारणी सभेतर्फे मुंबई राज्य सरकारकडे मागणी केली होती, की मुंबई राज्य सरकारकतर्फे मुंबई राज्य कायदेमंडळावर (विधिमंडळावर) सदस्य म्हणून अस्पृश्य समाजाचे दोन प्रतिनिधी नेमण्यात यावेत. त्यांची ही मागणी मान्य करून १९२६ च्या डिसेंबर मध्ये मुंबई कायदेमंडळावर आंबेडकर व पुरुषोत्तम सोलंकी यांना नेमण्यात आले. १ जानेवारी १९२७ रोजी आंबेडकर आणि त्यांचे कार्यकर्ते भीमा-कोरेगाव येथील 'विजयस्तंभ' येथे युद्ध जिंकलेल्या शूर महार रेजिमेंटच्या सैनिकांना अभिवादन करण्यासाठी आले असतानाचे छायाचित्र. छायाचित्रात पुष्पहार घातलेले आंबेडकर व त्यांच्या डाव्या हाताला शिवराम जानबा कांबळे व इतर कार्यकर्ते. १ जानेवारी १८१८ रोजी भीमा कोरेगाव येथे ब्रिटिश आणि पेशव्यांमध्ये लढाई झाली होती. या लढाईत ब्रिटिशांकडून बहुतांश दलित समाजाचे महार सैनिक लढले होते. १ जानेवारी १९२७ रोजी पुणे जिल्ह्यातील भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मानवंदना देऊन त्यावर्षी स्मृतिदिन साजरा केला. त्यावेळी त्यांनी महार बटालियनच्या शौर्याचे कौतुक केले. आंबेडकरांच्या भेटीनंतर त्यांच्या अनुयायांनी मोठ्या प्रमाणात या विजयस्तंभाला भेट देण्यास सुरुवात केली. महार लोक आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा विरोध म्हणून पेशव्यांच्या ब्राह्मणी प्रशासनाविरुद्ध ब्रिटिश सैन्याचा भाग म्हणून लढले.१०४ त्यांच्या व त्या दिवसाच्या स्मृतिप्रीत्यर्थ व महार बटालियनच्या शौर्याचे प्रतिक म्हणून ब्रिटिशांनी भीमा नदीच्या तीरावर कोरेगाव येथे एक विजयस्तंभ उभारला आहे. आंबेडकरांनी कोरेगावला दलित स्वाभिमानाचे प्रतीक बनवले. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे दिलेल्या भाषणात आंबेडकर अस्पृश्यांना उद्देशून म्हणाले की तूम्ही शूर वीरांची संतान आहात, ही गोष्ट काल्पनिक नव्हे. भीमा कोरेगावला जाऊन बघा तुमच्या पूर्वजांची नावे तेथील विजयस्तंभावर कोरलेली आहेत. तो पुरावा आहे की तुम्ही भेड बकरींची संतान नसून सिंहाचे छावे आहात.

डॉ. आंबेडकर मुंबई प्रांतिक विधानपरिषदेचे सदस्य असताना इ.स. १९२७च्या सुमारास त्यांनी पिण्याच्या पाण्यासाठी व हिंदू देवळांमध्ये प्रवेशासाठी चळवळी व मोर्चे काढण्यास सुरुवात केली.१०८ संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. ४ ऑगस्ट इ.स. १९२३ रोजी ब्राह्मणेतर पक्षाचे नेते व मुंबई कायदेमंडळाचे सभासद असलेले समाजसुधारक रावबहादुर सीताराम केशव बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळात सार्वजनिक निधीतून बांधलेली किंवा शासकिय नियमांनुसार बनविलेल्या संस्थांनी प्रशासित केली सार्वजनिक शाळा, न्यायालये, कार्यालये आणि दवाखाने व सर्व सार्वजनिक पाण्याची ठिकाणे, विहिरी व धर्मशाळाचा वापर करण्यास परिषदेने अस्पृश्य वर्गांना परवानगी असावी. असा ठराव मंजूर करून घेतला.१०९११० रावबहादुर बोले यांनी ५ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबई विधिमंडळात ज्या नगरपालिका आणि जिल्हामंडळे पहिल्या ठरावाची अंमलबजावणी करणार नाहीत, त्यांना सरकारतर्फे दिले जाणारे वार्षिक अनुदान बंद करण्यात यावे. असा दुसरा ठराव मांडला या ठरावानुसार महाडच्या नगरपालिकेने आपल्या ताब्यातील चवदार तळे अस्पृश्यांना खुले केल्याचे जाहीर केले. परंतु सनातनी स्पृश्यांनी अस्पृश्यांना तळ्यातून पाणी भरू दिले नाही.१०९ अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी आंबेडकरांनी १९ मार्च व २० मार्च १९२७ रोजी येथे स्वतःच्या अध्यक्षतेखाली कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, अधिवेशन पहिले अशा नावाखाली परिषद भरवली आणि २० मार्च १९२७ रोजी महाड येथे आंदोलन सुरू करण्याचे निश्चित केले. या कुलाबा परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधरपंत सहस्त्रबुद्धे आणि बापूराव जोशी हे दलितेतर सवर्ण व ब्राह्मण नेते सुद्धा उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करून पुढील ठराव पास झाले. आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून माणुसकीचे व सन्मानाचे जीवन जगण्याचा संदेश दिला. २० मार्च १९२७ रोजी आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली परिषदेतील सर्वांनी चवदार तळ्याकडे कूच केली. आंबेडकरांनी सर्वप्रथम चवदार तळ्यातील पाणी आपल्या हातांच्या ओंजळीत घेतले व तो पाणी प्राशन केले. त्यानंतर सर्व आंदोलनकर्त्यांनी आंबेडकरांचे अनुसरण करत तळ्यातील पाणी प्राशन केले. ही घटना महाडमधील रूढीवादी स्पृश्य हिंदुंना सहन झाली नाही. त्यांनी दलितांसाठींच्या भोजनामध्ये माती मिसळली व नंतर झुंडीने येत दलितांवर लाठया-काठ्यांनी हल्ले केले. आंबेडकरांनी आंदोलनकारी अस्पृश्यांना प्रतिहल्ला करु नका असे अवाहन केले. अस्पृश्यांना जबर मारहाण करण्यात आली, खूप लोक जखमी झाले होते. अस्पृश्यांनी तळे बाटवले असे म्हणून चवदार चळ्यात गोमूत्र टाकून तळ्याचे ब्राह्मणांकडून शुद्धीकरण केले. सरकारच्या प्रतिनिधींनी हल्लेखोर स्पृश्यांना अटक करून त्यांच्यावर खटला चालू केला. या आंदोलनाद्वारे आंबेडकरांनी आपला कायदेशीर, नागरी व मानवी हक्क अमलात अस्पृश्यांबरोबर सामुदायिक रीतीने चवदार तळ्याचे पाणी पिण्याचे आंदोलन यशस्वी केले. यामध्ये त्यांना संभाजी गायकवाड, विश्राम सवादकर, रामचंद्र मोरे, शिवराम जाधव, केशवराव व गोविंद आड्रेकर इत्यादी अस्पृश्य कार्यकर्त्यांचे तसेच अनंतराव विनायक चित्रे, सुरेंद्रनाथ टिपणीस, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, कमलाकांत चित्रे इत्यादी स्पृश्य समाजसेवकांचेही महत्त्वाचे सहकार्य मिळाले होते. स्पृश्यास्पृश्य भेद संपवून सामाजिक समता प्रस्तावित करणे, हे आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचे प्रमुख ध्येय होते.

# संकटग्रस्त महिलांच्या मदतीसाठी धुळ्यात 'सखी वन स्टॉप सेंटर'

महिलांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी केंद्र शासनाने सखी वन स्टॉप सेंटर प्रत्येक जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित केले आहे. अत्याचारग्रस्त महिलांना एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर मदत, समुपदेशन व गरज असल्यास आश्रयाची सोय उपलब्ध व्हावी, या हेतुने केंद्र सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाकडून सुरु करण्यात आलेले सखी वन स्टॉप सेंटर महिलांसाठी सहाय्यभूत ठरले आहे. शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ, कौटुंबिक छळ, सिड हल्ला किंवा सायबर क्राईममधील कोणत्याही अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना पोलीस, वकील, समुपदेशक अशा अनेकांची मदत घ्यावी लागते. अशा वेळी सखी वन स्टॉप सेंटर पिडीतेच्या पाठीशी उभी राहुन लढा देत त्यांना न्याय मिळवुन देण्याचे काम करीत आहे.

महिलांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी केंद्र शासनाने सखी वन स्टॉप सेंटर प्रत्येक जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित केले आहे. धुळ्यात जिल्हा प्रशासकीय संकुल, जुने कलेक्टर ऑफिस आवारात जिल्हा कोषागार कार्यालयसमोर असलेल्या इमारतीत फेब्रुवारी, २०२१ पासुन सखी वन स्टॉप सेंटर सुरु करण्यात आले असून या अडीच वर्षांच्या कालावधीत या सेंटरने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या मदतीने १ फेब्रुवारी,२०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत आजपर्यंत ८१४ पिडीत महिलांच्या विविध समस्यांवर निवारण करुन त्यांना विविध सेवा उपलब्ध करुन देत न्याय देण्याचे कार्य केले आहे.

कौटुंबिक हिंसाचारासह लैंगिक शोषण, बालविवाह, हुंडाबळी, छळ, जाच, सिड हल्ले, सायबर क्राइम आणि बाल लैंगिक शोषणग्रस्त पिडीतांनी धुळे येथे सखी वन स्टॉप सेंटरमध्ये संपर्क साधावा, असे आवाहन धुळे सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र व्यवस्थापक ड. रोहिणी महाजन यांनी केले आहे.

सहा प्रकारांची केली जाते मदत – सखी वन स्टॉप सेंटर मार्फत पिडीत महिलांना सहा प्रकारची मदत केली जाते. यामध्ये कायदेशीर मदत, पोलीस मदत, समुपदेशन, वैद्यकीय मदत, तात्पुरता निवारा, व्हिडीओ कॉन्फरन्स सुविधा, पोलीस सहायता आदींचा समावेश आहे. हे कार्यालय पिडीत महिलांसाठी २४ ु ७ सुरु असते. तसेच महिलांना केंद्रात आल्यावर शासकीय योजनांसंबंधी माहिती दिली जाते. त्याचबरोबर इतर काही अडचणी असतील तर त्याही समुपदेशनद्वारे सोडविल्या जातात. सखी वन स्टॉप सेंटरमध्ये आलेल्या अत्याचारग्रस्त व गरजू महिलांना निवाऱ्याची गरज असल्यास त्यांना सेंटरमार्फत पाच दिवसाचा तात्पुरता निवारा दिला जातो.

असे होते केंद्रातुन काम – कौटुंबिक हिंसाचार किंवा इतर अत्याचारांना सामोरे जाणाऱ्या महिलांना एकाच छताखाली सर्व प्रकारची मदत मिळावी, यासाठी धुळे जिल्ह्यात 'सखी वन स्टॉप सेंटर' (Sakhi One Stop Center) प्रभावीपणे कार्यरत आहे. मानसिकरित्या खच्चीकरण झालेल्या महिलांना पुन्हा उभारी देण्यासाठी येथे मोफत वैद्यकीय सेवा, पोलीस मदत, कायदेशीर सल्ला आणि समुपदेशन अशा सुविधा २४ तास पुरविल्या जात आहेत. हे केंद्र जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या थेट नियंत्रणाखाली चालवले जाते. केंद्राच्या कामकाजासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडून एका नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्यात आली आहे. महिलांना कोणत्याही वेळी मदत मिळावी यासाठी हे केंद्र २४ x ७ सुरू असून, त्यासाठी १३ कर्मचारी कार्यरत आहेत. केंद्राच्या संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी केंद्र व्यवस्थापकांकडे सोपवण्यात आली आहे. कायदेशीर व तातडीची मदत : अनेकदा पीडित महिलांना कायदेशीर प्रक्रियेची माहिती नसते. अशा महिलांना योग्य दिशा दाखवण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रात विशेष वकिलाची नियुक्ती करण्यात आली आहे. संकटग्रस्त महिला स्वतः प्रत्यक्ष येऊन, सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत किंवा पोलीस प्रशासनाच्या मदतीने या केंद्राशी संपर्क साधू शकतात.

१८१ हेल्पलाइनचा वापर करा : तातडीच्या मदतीसाठी शासनाचा १८१ हा महिला हेल्पलाइन क्रमांक कार्यान्वित आहे. जिल्ह्यातील गरजू आणि संकटग्रस्त महिलांनी कोणत्याही भीतीशिवाय या क्रमांकावर किंवा सखी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते , जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र भामरे, आणि सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र व्यवस्थापक ड. रोहिणी महाजन यांनी केले आहे. सखी वन स्टॉप सेंटरचा पत्ता असा : सखी वन स्टॉप सेंटर, धुळे जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जिल्हा कोषागार कार्यालयासमोर, धुळे (दूरध्वनी क्रमांक ०२५६२-२९५८७४ येथे संपर्क साधावा.

# बालविवाहास चालना द्याल, तर होऊ शकतो तुरुंगवास !

## बालविवाह होत असल्यास १०९८ हेल्पलाइनवर माहिती देण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नियमातील कलम ८, १० व ११ नुसार १८ वर्षापेक्षा जास्त वयाच्या पुरुषाने बाल वधूशी विवाह केल्यास त्या पुरुषाला तसेच जाणिवपूर्वक बाल विवाह ठरविल्यास किंवा सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतील. अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र भामरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये दिली आहे.

अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर देशात मोठ्या प्रमाणात विवाह आयोजित केले जातात. यामध्ये बालविवाह सुध्दा होण्याची शक्यता असते. बाल विवाह प्रतिबंधक कायदा २००६ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बाल विवाह ही प्रथा बाल हक्कांच्या विरोधी असून बाल विवाह प्रतिबंधक अधिनियमानुसार असे विवाह बेकायदा ठरतात. या कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक आणि शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे बालविवाह रोखणे आणि बाल हक्कांच्या संरक्षणासाठी अधिक सक्षमपणे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गावात आठवड्यातून किमान दोन वेळेस दवंडी देऊन बालविवाह विषयी जनजागृती करण्यात यावी. गावात बालविवाह होत असल्यास तातडीने थांबविण्यात यावा व चाईल्डलाईन १०९८ (दहा, नऊ, आठ) वर देखील फोन करून अवगत करण्यात यावे. तसेच बालविवाह होणार असल्याची पूर्व माहिती मिळाल्यावर त्यावर तातडीने योग्य ती कार्यवाही करावी. बाल विवाहाला चालना देणे, बाल विवाह समारंभात व्यवसाय सेवा पुरविणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे विवाह समारंभात व्यवसाय सेवा पुरवितांना वधू–वराच्या वयाबाबतची माहिती घेऊन बालविवाह नसल्याची खात्री करून घ्यावी, बालविवाहासाठी व्यवसाय सेवा पुरवितांना आढळून आल्यास संबंधितांवर कारदेशीर कारवाई केली जाईल, अशा इशारा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिला आहे.

बालविवाह विधीपूर्वक लावण्याबद्दल तसेच बालविवाह विधीपूर्वक लावण्यासाठी चालना देणे किंवा परवानगी देणे कायद्याने शिक्षा करणे बंधनकारक आहे. विवाहासाठी वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. वधू–वरांचा कायद्याने निश्चित केलेल्या वयापेक्षा कमी वयात विवाह केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास, कायद्याप्रमाणे असा विवाह हा बालविवाह ठरत असल्याने संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल होवू शकतो. बाल विवाहामध्ये ज्यांचा सहभाग असेल अशा सर्व घटकांना शिक्षा करण्याची तरतूद आहे. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ च्या नियमातील कलम ९, १० व ११ अन्वये १८ वर्षापेक्षा जास्त वयाच्या पुरुषाने बाल वधूशी विवाह केल्यास त्या पुरुषाला तसेच जाणिवपूर्वक बाल विवाह ठरविल्यास किंवा सोहळा पार पाडणा–यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची आणि १ लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकेल. बालकांविषयीच्या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता ग्राम बाल संरक्षण समिती व नगर बाल संरक्षण समितीची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून ग्रामस्तरावर ग्रामसेवक यांना आणि नागरी क्षेत्रात बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना नियुक्त करण्यात आलेले आहे. बालविवाह हा सामाजिक आरोग्यास अपायकारक असून बाल विवाहामुळे माता–बाल आरोग्याचे गंभीर प्रश्न उद्भवतात. त्यामुळे बाल विवाह घडवून आणणारे, त्याला चालना देणारे, व्यवसाय सामाजिक आरोग्यास घातक ठरु शकतात, परिणामी समाजाच्या आरोग्याला किंवा शरीर स्वास्थ्याला अपायकारक असणा–या बाल विवाह करण्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता बालविवाहास चालना देणाऱ्या व्यवसायास मनाई व विनियमन करण्याची खात्री झाल्याने हा सार्वजनिक उपद्रव दूर करण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, धुळे व शिरपूर यांनी याबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.

आदेशात धुळे व शिरपूर उपविभागातील संपूर्ण कार्य क्षेत्रात बालविवाह रोखण्याकामी कार्यक्षेत्रात येणारी मंगल कार्यालये, पुरोहित (सर्वधर्मीय), फोटोग्राफर्स, व्हीडीओग्राफर्स, केटरर्स, मंडप डेकोरेटर्स, लाईटस आणि बॅण्ड, डीजे साऊंड सर्व्हिस तसेच संबंधित व्यावसायिक यांना बाल विवाह समारंभामध्ये व्यवसाय सेवा देण्यास मनाई आहे. तसेच व्यावसायिकांनी कोणत्याही विवाह समारंभात सेवा देण्यापूर्वी सदर विवाह हा बालविवाह नसल्याची काळजी घेणे आवश्यक राहील. यासाठी उक्त व्यावसायिकांनी ते ज्या विवाह समारंभात सेवा देणार आहेत, तेथील विवाहेच्छुक वधू–वरांची माहिती आधारकार्ड, जन्मदाखला किवा दोन्हीच्या स्वसाक्षांकित प्रती व फोटोसहित त्यांच्या स्वतंत्र नोंदवहीत नोंदवावी, आधारकार्डवरील जन्म तारखेवरुन विवाहेच्छुक वधू–वरांचे वय कायद्याप्रमाणे योग्य असल्याची पडताळणी करावी, अशी पडताळणी न करता बाल विवाहाच्या समारंभात सेवा दिल्यास अशी कृती ही बाल विवाहास चालना देणारी किंबहुना सामाजिक आरोग्यास घातक कृती समजली जाईल व कायदेशीर कारवाई केली जाईल.

स्थानिक ग्रामपंचायतीने त्यांचे कार्यक्षेत्र व आसपासच्या गावातील असे व्यवसाय उदीम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांची यादी, त्यांचे संपर्क क्रमांक व अनुषंगीक माहिती स्वतंत्र नोंदवहीत नोंदवून जतन करावी. विवाह समारंभाशी संबंधित व्यावसायिकांकडील नोंदवह्या व ग्रामपंचायतीकडील नोंदवह्या तपासण्याचा व त्यातील माहिती वापरण्याचा अधिकार संबंधित कार्यक्षेत्रातील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी व ग्राम नगरस्तरीय बाल संरक्षण समितीस असेल. त्यावरून या समितीस किवा अधिका–यास बाल विवाहाबद्दल अवगत झाल्यास, बालविवाहास चालना देणाऱ्या संबंधितांविरूध्द बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अन्वये कलम ९.१०.११ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १३३ तसेच भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ (सुधारीत भारतीय न्याय सहिता) अन्वये कारवाई करण्यात येईल.

मंगल कार्यालये, पुरोहित (सर्वधर्मीय), फोटोग्राफर्स, व्हिडीओग्राफर्स केटरर्स/मंडप डेकोरेटर्स लाईटस आणि बॅण्ड डीजे साऊंड सर्व्हिस तसेच संबंधीत व्यावसायिक यांनी विवाह सोहळ्यासाठी सेवा पुरवितांना तसेच सहभागी व–हाडी मंडळी यांनी विवाह करविताना संबंधित विवाह बालविवाह नसल्याची खात्री करून त्याबाबत काळजी घ्यावी. अन्यथा संबंधिता विरोधात बालविवाह प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो, असेही जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी आदेशीत केले आहे. बालविवाह झालेल्या मुलीचा लैंगिक विकास पुरेसा झालेला नसतो. अशा स्थितीत १८ वर्षांच्याआत त्यांना गर्भधारणा झाली तर बाळाच्या पोषणासाठी शरीर सक्षम नसते. घरातील कामाचे ओझे आणि त्यातच अपुरे पोषण याचे दुष्परिणाम बाळाच्या आरोग्यावर होतात. लहान वयात लग्न झाल्यामुळे लैंगिकतेविषयी पुरेसे ज्ञान या मुलींना नसते. कुटुंब नियोजन, गर्भधारणा आणि गर्भारपणात घ्यावयाची काळजी हे तर फारच जिव्हाळ्याचे विषय असतात. त्यामुळे कधी कधी आपले बाळ हे जगात येण्याआधी, कधी जन्मानंतर लगेच, तर कधी जन्मानंतर एक दोन वर्षांत गमवावे लागते. बालविवाहामुळे माता व बालकांच्या आरोग्याचे गंभीर प्रश्न उद्भवत असल्याने बालविवाह हा सामाजिक आरोग्यांचा प्रश्न बनला आहे. बाल विवाह होत असल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर संपर्क करावा.

– राजेंद्र भामरे , जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,धुळे

गेल्या ५ वर्षांत २२९ बाल विवाह थांबविण्यात आले असून ८ प्रकरणांत गुन्हे नोंदविण्यात आले आहे. सन २०२५–२०२६ वर्षांत धुळे शहर –५, धुळे तालुका २०, साक्री ७, शिरपूर १७ तर शिंदखेडा ९ असे ५८ बाल विवाह थांबविण्यात प्रशासनास यश आले आहे.

– सतीश चव्हाण, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी,धुळे

# शिवछत्रपती क्रीडा प्रबोधिनीत प्रवेशासाठी आवाहन
## जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील

धुळे (जिमाका) – राज्यातून प्रतिभावान खेळाडूची निवड करुन त्यांना संतुलित आहार व अद्यावत क्रीडा सुविधा पुरवणे, सुसंघटीत करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्यासाठी क्रीडा युवक सेवा संचालनालय शिवछत्रपती क्रीडापीठ म्हाळुंगे–बालेवाडी, पुणे अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधनी कार्यरत आहे. या ९ क्रीडा प्रबोधणीमध्ये सन २०२६–२०२७ करिता निवासी व अनिवासी खेळाडू करिता ५० टक्के सरळसेवा, ५० टक्के कौशल्य चाचणीच्या आधारे प्रवेश देण्यात येणार आहे. यासाठी खेळाडूंनी प्रवेशासाठी अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपुर, छत्रपती संभाजी नगर, गडचिरोली अशा ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधनी स्थापन करण्यात आल्या आहेत. या क्रीडा प्रबोधिनीमध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यात ज्युदो, जिम्नॅस्टीक, हॉकी, शुटीग, फुटबॉल, जलतरण, अंथलेस्टीक, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅन्डबॉल, टेबलटेनिस, वेटलिफ्टरींग, ट्रायथलॉन, सायकलिंग, बॉक्सींग अशा एकूण १६ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण दिले जाईल. प्रवेश प्रक्रीया सरळ प्रवेश व कौशल्या चाचणी करिता अटी प्रवेश देण्यात येईल.यात सरळ प्रवेशात क्रीडा प्रबोधनीतील असलेल्या संबधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनीधीत्व केलेले खेळाडू ज्याचे वय हे १९ वर्ष आतील आहे अशा खेळाडूना संबधित खेळाच्या चाचणीत समिती समक्ष देऊन प्रवेश देण्यात येईल.तथापि, सरळ प्रवेश प्रक्रियेमध्ये जर इच्छुकांची संख्या ५० टक्के पेक्षा जास्त असल्यास प्रथम प्राधान्य सरळ प्रवेशअंतर्गत पात्र होणाऱ्या निवासी अनिवासी खेळाडूंना होईल. खेळ निहाय कौशल्या चाचणीसाठी क्रीडा प्रबोधिनीत असलेल्या खेळ प्रकारात राज्यस्तरावर सहभागी खेळाडू ज्याचे वय १९ वर्ष आहे. अशा खेळाडूना संबधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करुन गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जाईल. खेलो इंडिया राज्य निपुत्ता केंद्र,पुणे थेलेटिक सायकलिंग शूटिंग खेळात ज्यांचे वय २० आहे. अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची कौशल्य चाचणी तज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चित केला जाईल. खेलो इंडिया राज्य निपुत्ता केंद्र, पुणे थलेटिक सायकलिंग शूटिंग खेळात ज्यांचे वय वीस वर्षातील आहे. अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची कौशल्य चाचणी तज्ञ समिती समक्ष प्रवेश दिला जाईल.

क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी विभागीय व राज्यस्तरीय चाचणीचे आयोजन करण्यात येणार असून शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, खेळाडू यांनी सर्व प्रथम जिल्हास्तरावर प्रथम नाव नोंदणी ही विहित नमून्यात माहिती देवून त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जिल्हा क्रीडा संकुल, वाडीभोकर रोड,देवपूर धुळे येथे २४ एप्रिल, २०२३ पर्यंत दूपारी ३ वाजेपर्यंत करावी. जिल्हास्तरावरील नाव नांदणी झालेल्या व पात्र ठरलेल्या खेळांडूची नावे कार्यालयामार्फत कळविण्यात येईल. त्यांनी विभागस्तरीय चाचणीसाठी २७ ते ३० एप्रिल, २०२६ रोजी स्वखर्चाने उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी मुद्रा अग्रवाल ७४९९६३६१५४ योगेश्वरी मिस्तरी ७५०७३२४८१४ यांच्याशी संपर्क साधावा.असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.पाटील यांनी केले आहे.

# राज्यात नऊ नवीन कारागृहे प्रस्तावित; बंदी क्षमतेत वाढ

मुंबई– राज्यात पालघर, अहिल्यानगर, बारामती, येरवडा क्र.०२ व क्र. ०३ जि. पुणे, गोंदिया, हिंगोली, भुसावळ (जि. जळगाव) व अंबाजोगाई (जि. बीड) अशा एकूण नऊ ठिकाणी नवीन मध्यवर्ती व जिल्हा कारागृहे बांधणे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार एकूण १२ हजार २५८ ने बंदी क्षमतेत वाढ होणार आहे. त्यापैकी पालघर, नारायणडोह (अहिल्यानगर) व बारामती (पुणे) येथे अनुक्रमे १८, ३५ व ६० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित बांधकामे प्रगतीपथावर आहेत. येरवडा मध्यवर्ती, येरवडा खुले, येरवडा महिला खुले कारागृह, नागपूर मध्यवर्ती कारागृह, बुलढाणा जिल्हा कारागृह, यवतमाळ व वर्धा जिल्हा कारागृह येथे सर्व मिळून ३५ बॅरेकची बांधकामे प्रगतीपथावर असून ती पूर्ण होताच एकूण अधिकृत बंदी क्षमतेत १,०३५ एवढी वाढ होणार आहे. तसेच २०२५–२६ या आर्थिक वर्षात संभाजीनगर मध्यवर्ती व संभाजीनगर खुले कारागृह, अकोला महिला खुले कारागृह, कोल्हापूर खुले कारागृह, विसापूर (जि. अहिल्यानगर) खुले कारागृह, लातूर जिल्हा कारागृह, जालना जिल्हा कारागृह व धुळे खुले कारागृह या अस्तित्वातील कारागृहांत अतिरिक्त बॅरेक्सच्या बांधकामास प्रशसकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरची बांधकामे पूर्ण होताच एकूण ११३८ एवढ्या बंदी क्षमतेत वाढ होणार आहे. नवीन कारागृह बांधकामांची एकूण बंदी क्षमता १२,२५८ व अतिरिक्त बॅरेक्सची बांधकामे ४,०२९ असे एकूण १६,२८७ नव्याने बंदी क्षमतेत वाढ होणार आहे. राज्यातील कारागृहातील बंद्याची वाढती संख्या लक्षात घेता एकूण १४ ठिकाणी नवीन जागेची मागणी करण्यात आली आहे. नवीन जागा कारागृह विभागास प्राप्त होताच, त्या ठिकाणी नवीन मध्यवर्ती/जिल्हा कारागृहे प्रस्तावित करता येतील. त्यामुळे देखील राज्यातील कारागृहांची अधिकृत बंदी क्षमतेत वाढ होणार आहे.

मुंबई मध्यवर्ती कारागृहाचा पुर्नविकास करण्याच्या दृष्टीने त्याचे नकाशे व आराखडे तयार करण्याची कार्यवाही पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. मुंबई यांच्याकडून प्रगतीत आहे. मुंबई मध्यवर्ती कारागृहातील सर्कल क्र. १२ सी हा संपूर्ण व सर्कल क्र. १२बी या इमारतीचा तळमजला हे सद्यस्थितीत विधि विभागाच्या ताब्यात आहेत. ते दोन्ही भाग कारागृह विभागास हस्तांतर करण्याची कार्यवाही चालू आहे. तरी राज्यातील कारागृहात बंद्यांची अतिगर्दी कमी करण्याच्या अनुषंगाने नविन कारागृहांचे बांधकाम, अस्तित्वातील कारागृहांत अतिरिक्त बॅरेक्सचे बांधकाम तसेन नवीन कारागृहांच्या बांधकामासाठी नवीन जागेची मागणी अशा उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती गृह विभागाने दिली आहे.

# महाराष्ट्र दिनाच्या मुख्य सोहळ्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने
## जबाबदारी पार पाडावी–निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त दि. १ मे २०२६ रोजी पोलिस कवायत मैदान येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मुख्य ध्वजारोहण समारंभाच्या अनुषंगाने सर्व विभागांनी निश्चित केलेली जबाबदारी पार पाडावी, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात १ मे महाराष्ट्र दिन मुख्य स्थापनादिन समारंभाच्या तयारीच्या दृष्टीने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, जिल्हा पुरवठा अधिकारी संजय बागडे,राज्य उत्पादन शुल्काच्या अधीक्षक स्वाती काकडे, पोलीस उपअधीक्षक ज्ञानेश्वर जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता धर्मेंद्र झाल्टे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रतिभा ठाकुर, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अजिज पाठक, सहायक पुरवठा अधिकारी अर्चना भगत, नायब तहसीलदार मायानंद भामरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी श्री.पवार म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनाचा समारंभ, राज्याच्या प्रगतीचे व विकासदृष्टीचे प्रतीक आहे.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत डिजिटल प्रशिक्षण उपकरणाच्या आधुनिक सुविधा उपलब्ध

धुळे (जिमाका) – अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत केवळ आर्थिक सहाय्य देण्यापुरताच मर्यादित न राहता लाभार्थ्यांना सक्षम उद्योजक बनविण्यावर विषय भर देण्यात येत आहे याच अनुषंगाने डिजिटल प्रशिक्षण उपकरण (मार्केटिंग टॅब) सारख्या आधुनिक सुविधांची अंमलबजावणी करून लाभार्थ्यांना व्यवसाय वृद्धीसाठी सर्वकष पाठबळ देण्यासाठी डिजिटल प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अशी माहिती महामंडळाचे जिल्हा समन्वयक विनायक अस्वार यांनी दिली आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात उत्पादन तयार करणे जितके महत्त्वाचे आहे. तितकेच ते योग्य ग्राहकांपर्यंत पोहोचवणे ही आवश्यक आहे. अनेक लघुउद्योजकांकडे दर्जेदार उत्पादने असतील तरी त्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत नाही. हीच समस्या दूर करण्यासाठी महामंडळाने आपल्या अधिकृत पोर्टलवर व्यवसाय वर्धन (Business Promotion) (मार्केटिंग टॅब) विकसित केले आहे. हा (मार्केटिंग टॅब) प्रसिद्ध–कॉमर्स प्लॅटफॉर्मस जसे की फ्लिपकार्ट, मेझान आणि इंडियन मार्ट यांच्या धरतीवर तयार करण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे लाभार्थ्यांना त्यांच्या उत्पादनाची माहिती, फोटो, किंमत, संपर्क तपशील व व्यवसायाचा पत्ता अपलोड करण्याची सुविधा मिळते. सध्या या प्लॅटफॉर्मवर २७,५०० पेक्षा अधिक व्यवसायांची नोंदणी करण्यात आली आहे. यामध्ये व्यवसाय श्रेणी, उपश्रेणी, महसूल विभाग, जिल्हा व तालुका याप्रमाणे सर्च सुविधा देण्यात आली असून, नागरिकांना या सुविधेचा वापर करून नजिकच्या महामंडळाच्या लाभार्थ्यांची माहिती शोधता येईल व लाभार्थ्यांची उत्पादने व सेवा यांचा लाभ घेता येऊ शकेल.

या माध्यमातून लोकल ते ग्लोबल ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. लहान लहान व्यवसायिकांनाही महामंडळाच्या पोर्टल मार्फत व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली आहे. तरी सर्व लाभार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा व्यवसाय वर्धन बाबत आवश्यकतेनुसार अधिक सहकार्यासाठी महामंडळाचा जिल्हा समन्वयकांना संपर्क करावा. भविष्यात लाभार्थ्यांच्या मागणीनुसार पेमेन्ट गेटवे बाबत महामंडळाकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. कोणत्याही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी केवळ भांडवल पुरेसे नसून, योग्य ज्ञान, कौशल्य आणि बाजारपेठेची समज असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक लाभार्थ्यांकडे व्यवसाय करण्याची इच्छा असली तरी त्यांना व्यवस्थापन, तांत्रिक माहिती, मार्केटिंग, ग्राहक हाताळणी, आर्थिक नियोजन आणि डिजिटल साधनांचा वापर याबाबत पुरेशी माहिती नसते. हीच गरज ओळखून महामंडळाने वेबीनार, यूट्यूब, आणि पॉडकास्ट यांच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहेत. व्यवसाय कसा सुरू करावा आणि वाढवावा, उत्पादनाची गुणवत्ता व ब्रँडिंग कशी करावी, डिजिटल मार्केटिंग व सोशल मीडियाचा वापर, ग्राहकांशी संवाद आणि विक्री कौशल्ये, आर्थिक नियोजन व नफा वाढविण्याचे मार्ग अशी विविध प्रशिक्षणाद्वारे लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. महामंडळाने नियोजित केलेल्या प्रशिक्षणाचे व्हिडिओ अधिकृत यूट्यूब व फेसबुक वर उपलब्ध करून दिल्यामुळे लाभार्थ्यांना त्यांचा सोयीच्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येते. विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील उद्योजकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. तसेच महामंडळाने डीजीलॉकर सेवा स्वतःच्या प्रणालीमध्ये समाविष्ट केली आहे. त्यामुळे कागदपत्र पडताळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, वेगवान व विश्वासार्ह करण्यात आली आहे. भविष्यात महा–आयडी व भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (युआयडीआय) बाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहकत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)